# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


दि. १९ ऑक्टोबर, २०२६

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई मार्फत दि. ०६ नोव्हेंबर, २०२६ ते दि. ११ नोव्हेंबर, २०२६ (धनत्रयोदशी ते भाऊबीज) दीपावली निमित्त मंदिर इमारत व प्रतिक्षालय इमारत यावर तसेच मंदिराच्या रिध्दी गेट ते श्रीसिध्दिविनायक पोलिस चौकी या परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे.

---

दि. ०६ नोव्हेंबर, २०२६ ते दि. ११ नोव्हेंबर, २०२६ (धनत्रयोदशी ते भाऊबीज) दीपावली या कालावधीत श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई येथे आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

| SR. NO. | DESCRIPTION | AMOUNT RS. |
|---|---|---|
| 1 | Led 5000 bulb Series | |
| 2 | Led 6000 bulb Series (12 Volt) | |
| 3 | LED pixel Patta 10 Nos | |
| 4 | Neckless 12000 bulb Series (12 Volt) | |
| | Total Amount Rupees (Excluding All Taxes) | |

अटी व शर्ती :–

१) शनिवार, दि. २४ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा लाखेने सिलबंद करून प्रतिक्षालयाच्या तळ मजल्यावर टपाल कार्यालयात सादर करावा. ए–४ साईजचे दोन मोठे लिफाफे (एक तांत्रिक लिफाफा व एक मूल्य लिफाफा) लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मूल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे. एका बाजूला दरपत्रकधारकाचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहिण्यात यावे तसेच दुसऱ्या बाजूला श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई, देखभाल व दुरूस्ती विभाग असे लिहावे. मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर, २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे लिफाफे उघडण्यात येतील.

२) दरपत्रक सादर करताना दरपत्रकात (BOQ) नमूदप्रमाणे रक्कम भरावी. दरपत्रकधारकारांनी BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. मजूरी व वाहतूक खर्च) मूल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

३) दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची कागदपत्रे.

अ) कंपनी नोंदणी दाखला (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम नोंदणी प्रमाणपत्र)

ब) आयकर नोंदणी पॅन कार्ड.

क) सन २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ आय. टी. आर. रिटर्नस फाईल प्रत.(आर्थिक वर्ष)

ड) विद्युत रोषणाई करण्याबाबतचा कामाचा अनुभवाचा दाखला. (उदा. देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, शासकीय, निम शासकीय, महानगर पालिका) या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात. अन्यथा दरपत्रकधारकाला अपात्र ठरविण्यात येईल.

४) दरपत्रकधारक हा हिंदू असावा

५) ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय न्यासाने घेतल्यास दरपत्रकधारकास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत दरपत्रकधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६) विद्युत रोषणाई करतांना सुरक्षा नियमांचे पालन करावे. व त्याची योग्य ती खबरदारी घेणे बंधनकारक राहील.

७) सदर काम चालू असतांना "श्रीं" च्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणतीही इजा होणार नाही. यांची काळजी घेणेची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

८) विद्युत रोषणाई करतांना अथवा त्यानंतर सदर कामामुळे काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच विद्युत रोषणाई कामामुळे वरील पवित्र इमारतीचे काहीही नुकसान होऊ नये यांची खबरदारी घ्यावी. नुकसान झाल्यास न्यासामार्फत नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदाराच्या बिलातून वजा करण्यात येईल.

९) दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन (BOQ) व्यतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्यास अशा स्वरूपाचे अतिरिक्त काम कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावे. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

१०) विद्युत रोषणाईचे काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

११) दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील स्वत:करणे बंधनकारक राहील. उप कंत्राटदारास काम दिल्याचे निदर्शनास आल्यास बिलातून २५% रक्कम वजा करण्यात येईल. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

१२) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

**तरी वरील सर्व अटी व शर्तीस अनुसरून आपले दरपत्रक भरण्याचे करावे.**

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी